मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व.इंदिरा गांधी भवन, छपत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र.022-28192828,
निवडणुक निर्णय अधिकारी कार्यालय

जा.क्र.मनपा/नि.नि.अ/ 57 /2025-26 दि. 10/06/2025

प्रति,
जनसंपर्क अधिकारी / सिस्टम मॅनेजर
जनसंपर्क विभाग /संगणक विभाग
मिरा-भाईंदर महानगर पालिका.

**विषय:-** महाराष्ट्र पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) नियम 2016 नुसार 6 नगर पथ विक्रेता समिती सदस्यांचे नामनिर्देशित अर्ज मागविणेबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेतील शहर पथविक्रेत्यांचे निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे.

त्या अनुषंगाने नगर पथविक्रेता समितीचे 6 सदस्यांचे नामनिर्देशित पध्दतीने अर्ज मागविणेकामी जाहिर आवाहन नवराष्ट्र व महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रामध्ये तसेच मनपाच्या संकेत स्थळावर व नोटीस बोर्डवर प्रसिंध्द करण्यात यावी.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त तथा नोडल अधिकारी
नगर पथविक्रेता समिती निवडणूक
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

मिरा भाईदर महानगरपालिका
स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र.022-28192828,
समाज विकास विभाग

# जाहिर आवाहन

विषय :- महाराष्ट्र पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) नियम 2016 नुसार 6 नगर पथ विक्रेता समिती नामनिर्देशित सदस्यांचे अर्ज मागविणेबाबत...

केंद्र शासन पुरस्कृत दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान फेरीवाल्यांना सहाय्य या उपांगाअंतर्गत शहरातील फेरीवाल्यांना बाजाराच्या गरजेच्या आधारावर कौशल्यांचा विकास करून त्यांच्या उपजिविकेचा दर्जा उंचावण्यावर भर दिला जाणार आहे. त्या अनुषंगाने शहरी फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करणे, त्यांना ओळखपत्र देणे, शहरी फेरीवाला आराखाडा विकसित करणे, फेरीवाला क्षेत्रासाठी आवश्यक पायाभुत सुविधांचा विकास करणे, त्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन त्यांचा आर्थिक विकास करण्यात येणार आहे.

वरील उपाय योजना पूर्ण करण्यासाठी तसेच राष्ट्रीय फेरीवाला धोरणची अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रासाठी नगर पथ विक्रेता समिती घटीत करणे आवश्यक आहे. 03 ऑगस्ट 2016 रोजीचे महाराष्ट्र शासन राजपत्र व असाधारण भाग अ, प्रकरण. क्र. 4 नुसार शासकीय विभाग 6 सदस्य इतर मडळाचे 14 सदस्य आहेत. इतर मंडळामध्ये अशासकीय संघटना आणि समुदाय आधारित संघटना 2 सदस्य निवासी कल्याण संघ 2 सदस्य, व्यापारी संघाचा प्रतिनिधी 1 सदस्य , पणन संघाचा प्रतिनिधी 1 सदस्य व पथविक्रेता प्रतिनिधी 8 सदस्य अशा प्रकारची रचना आहे. तसेच इतर मंडळाचे नामनिर्देशित सदस्यांची निवड करण्यात येणार असुन ते खालीलप्रमाणे.

| अ. क्र | इतर मंडळे | पद | नामनिर्देशित घेण्यात येणाऱ्या सदस्य संख्या |
|---|---|---|---|
| 1 | अशासकीय संघटना आणि समुदाय आधारित संघटना | सदस्य | 2 |
| 2 | निवासी कल्याण संघ | सदस्य | 2 |
| 3 | व्यापारी संघाचा प्रतिनिधी | सदस्य | 1 |
| 4 | पणन संघाचा प्रतिनिधी | सदस्य | 1 |

वरील नगरपथविक्रेता नामनिर्देशित एकूण 6 सदस्यांची खालील अटी-शर्तीच्या अधिन राहून निवड करण्यात येणार आहे.

1. संघटना किंवा संघ, मागील तीन वर्षांचे सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली असावी.
2. संघटना किंवा संघ, मागील तीन वर्षांचे सक्षम प्राधिकरणाकडे तयार करण्यात आलेले लेखा परीक्षा अहवाल सादर करील.
3. संघटना किंवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळ्या यादीत टाकलेले नसावे.
4. संघटना किंवा संघ त्या त्या वेळी अंमलात कोणत्याही कायद्यान्वये सिध्द्रदोषी असणार नाहीत.
5. संघटना किंवा संघ यांना, त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असावा.

Scanned with OKEN Scanner

तरी वरील अटी-शर्ती घालून देण्यात आलेल्या निकषाच्या आधारावर अशासकीय संघटना किंवा समुदाय आधारित संघटना किंवा निवासी कल्याण संघाचे प्रातिनिधित्व करण्याऱ्या सदस्याचे नामनिर्देशित करण्यात येणार आहे. त्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नगर पथ विक्रेता समितीच्या 6 नामनिर्देशित सदस्यांचे दि.11/06/2025 ते 25/06/2025 या कालावधीत संपुर्ण कागदपत्रासह अर्ज मागविण्यात येत आहे. सदर नामनिर्देशित अर्ज समाज विकास विभाग (DAY-NULM कक्ष) पहिला मजला मुख्य कार्यालय मिरा भाईंदर महानरगरपालिका येथे जमा करावे.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त तथा नोडल अधिकारी
नगर पथविक्रेता समिती निवडणूक
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner